फोन नं. (02164) 272414, 8275706613
Web : http://gcekarad.ac.in
Email: principal@gcekarad.ac.in,
principal.gcoekarad@dtemaharashtra.gov.in

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,कराड

*(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)*

विद्यानगर, कराड पिन — ४१५१२४ जि. सातारा

जा.क्र.शाअक/डिनॲकेडमिक/२०२४-२०२५/380 दिनांकः- ०८/११/२०२४

**महत्वाची सुचना :-**

विषय :- अनुसुचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे सन २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीतील शिष्यवृत्ती/फ्रीशीप योजनेंतर्गत प्रलंबित अर्ज निकाली काढण्याबाबत..

संदर्भ :- मा.सहाय्यक आयुक्त समाजकल्याण सातारा यांचे पत्र क्रमांक सआसकसा/भासशि/अन्वेषण/२४-२५/५७२२ दिनांक २९/१०/२०२४

उपरोक्त विषयासंदर्भान्वये महाविद्यालयातील प्रवेशित अनुसुचित जाती प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधी मध्ये ज्या अनुसुचित प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे महाडिबीटी पोर्टल व्दारे ऑनलाईन पध्दतीने शिष्यवृत्ती/फ्रीशीप करीताचे अर्ज काही तांत्रिक अडचणींमुळे (१.आधार नोंदणी न केल्यामुळे २.शुल्क निश्चिती वेळेवर न झाल्यामुळे किंवा ३.निकाल वेळे न लागल्यामुळे ) महाडिबीटी पोर्टलवर ऑन लाईन फॉर्म भरुण सुध्दा मंजूर होऊ शकले नाहीत किंवा काही तांत्रिक अडचणींमुळे ऑनलाईन फॉर्म भरु शकले नाहीत अशा सर्व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीतील शिष्यवृत्ती/फ्रीशीप करीताचे अर्ज ऑफलाईन पध्दतीने दिनांक ३०/११/२०२४ पुर्वी भरुण सबंधीत कागदपत्रांचे पुर्ततेसह सदरचे अर्ज महाविद्यालयात समक्ष येऊन दिनांक ३०/११/२०२४ रोजी पर्यत जमा करावयाचे आहेत.

सदरचे अर्ज मा. सहाय्यक आयुक्त समाजकल्याण सातारा यांचे कार्यालयास तपासून विहीत प्रपत्रामध्ये माहिती भरुण विहीत मुदतीत सादर करावयाचे असल्याने **दिनांक ३०/११/२०२४ पर्यतच केलेले अर्ज स्विकारले जातील याची सबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.** अर्ज विहीत मुदतीत व कागदपत्रांच्या पुर्ततेसह महाविद्यालयास सादर न केल्यास शिष्यवृत्ती/फ्रीशीप प्राप्त न झालेस त्यास स्वतः विद्यार्थी जबाबदार राहील. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घेऊन अर्ज विहीत मुदतीत व कागदपत्रांच्या पुर्ततेसह महाविद्यालयास सादर करावेत.

08/11/24
प्र प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड

प्रत :-

१.महाविद्यालयाचे सर्व सुचना फलकांवर विद्यार्थ्यांचे माहितीसाठी
२.सर्व विभागाप्रमुखांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी
३.महाविद्यालयाचे संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी